## शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
## परिपत्रक

प्रति,
मा. प्राचार्य/संचालक,
सर्व संलग्न पारंपारिक व व्यावसायिक महाविद्यालये व परिसंस्था,
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर.

**विषय- संलग्नीत महाविद्यालयात शैक्षणिक वर्ष २०२२-२३ करिता संलग्नीकरणाचे नुतनीकरण/नैसर्गिक विस्तार/प्रयोगशाळा मान्यतेच्या प्रस्तावाच्या अनुषंगाने स्थानिक चौकशी समिती अहवाल प्रपत्र अ, ब व क ऑनलाईन पाठविणेबाबत.**

**संदर्भ- १) या कार्यालयाचे संलग्नता/टी-२/६७९ दि. २८/०९/२०२१ रोजीचे परिपत्रक**
**२) या कार्यालयाचे संलग्नता/टी-२/६८३ दि.०१/१०/२०२१ रोजीचे सुधारीत परिपत्रक**
**३) या कार्यालयाचे संलग्नता/टी-२/०००१८ दि.१८/०१/२०२२ रोजीचे परिपत्रक**

**महोदय/महोदया,**

उपरोक्त विषय व संदर्भांकित परिपत्रकान्वये सन २०२२-२३ या शैक्षणिक वर्षाकरिता संलग्नीकरणाचे नुतनीकरण, नैसर्गिक विस्तार, प्रयोगशाळा मान्यता (नुतनीकरण) इ. प्रस्ताव सादर केले आहेत. सदर प्रस्तावांच्या अनुषंगाने आपणास स्वयंमुल्याकन अहवाल अ, ब व क नमुना ऑनलाईन भरण्याबाबत तसेच या अनुषंगाने लवकरच स्थानिक चौकशी समित्या भेट देणार असल्याबाबत कळविण्यात आले होते. तथापि, दि.०१/१०/२०२१ रोजीच्या परिपत्रकान्वये स्वयंमुल्याकन अहवाल अ, ब व क नमुना ऑनलाईन भरण्यास मुदतवाढ देण्यात आली असल्याचे कळविण्यात आले होते. तरी सुध्दा बऱ्याच महाविद्यालयाने स्वयंमुल्यांकन अहवाल नमुना अ, ब व क भरले नसल्याचे निदर्शनास आले असल्याने उपरोक्त संदर्भ क्र. २ अन्वये स्वयंमुल्याकन अहवाल अ, ब व क नमुना दि. २५ जानेवारी, २०२२ पर्यंत ऑनलाईन भरण्याची कार्यवाही करून याबाबतची माहिती या कार्यालयाच्या affiliation.t२@unishivaji.ac.in या ईमेल आयडीवर सादर करण्याबाबत कळविण्यात आले होते.

तथापि, अद्यापही बऱ्याच महाविद्यालयांकडून सदरची माहिती प्राप्त झालेली नाही. याअनुषंगाने आपणास पुन:श्च कळविण्यात येते की, स्वयंमुल्यांकन अहवालाचे नमुने दि. १९ मार्च, २०२२ अखेर ऑनलाईन पध्दतीने भरावा. जी महाविद्यालये सदरचे नमुने ऑन लाईन सादर करणार नाहीत अशा महाविद्यालयांबाबत संलग्नीकरणाची कोणतीही कार्यवाही केली जाणार नाही याची कृपया नोंद घेण्यात यावी.

कळावे,

आदेशान्वये

(श्री. विलास एस. सोयम)
उपकुलसचिव
संलग्नता टी-२ विभाग

संदर्भ क्र. - संलग्नता/टी-२/ No 0 0 5 1 3.
दिनांक - 17 MAR 2022

G:\23.04.2021\sm\sm\Circular\Circular 2019.1.docx